**BDC LIBRARY**
**New Paper Clipping**
**A.Y. 2023-202**

# बी.डी. कॉलेजमध्ये शुक्रवारी आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र

**पाटण : पुढारी वृत्तसेवा**

बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने पाटण येथे दि. १५ मार्च रोजीआंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. कला विभागातून मराठी,हिंदी,इंग्रजी या भाषा तर सामाजिकशास्त्र विभागामधून अर्थशास्त्र, इतिहास,राज्यशास्त्र व भूगोलशास्त्र यांची एकत्रित एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. 'भाषा एवं संस्कृती मराठी, हिंदी आणि इंग्रजी साहित्यातील बदलते स्वरूप' या विषयावर हे चर्चासत्र आहे. तर सामाजिकशास्त्र विभागाचे 'शाश्वत विकासासाठी साधन संपत्तीचे नियोजन व व्यवस्थापन' या विषयावर चर्चासत्र असणार आहे. चर्चासत्राचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. डॉ. डी. के. शिर्के यांच्या हस्ते होणार असून, बीजभाषक म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रो. डॉ. आनंद कुलकर्णी व प्रो.डॉ. प्रवीण सप्तर्षी हे आहेत. तसेच या चर्चासत्रात विषयतज्ज्ञ म्हणून प्रो. डॉ. मिथिलेश अवस्थी, प्रो. डॉ. भरत जाधव, प्रो. डॉ. सुनील सावंत, प्रो. डॉ. रघुनाथ धमकले, प्रो. डॉ. सुनील बनसोडे, प्रो. डॉ. रणधीर शिंदे, प्रो.डॉ. नंदकुमार मोरे सामाजिकशास्त्र विभागाकडून प्रो.डॉ. विजय कुंभार, प्रो.डॉ. एस.के. पवार प्रो. डॉ. अवनीश पाटील विचारवंतांची मार्गदर्शक व्याख्याने होऊन त्यावर चर्चा होणार आहे.